वैद्यकीय खर्चाच्या परिपूर्तीची देयके मंजूर
करण्याचे अधिकार जिल्हा शल्य
चिकित्सक यांना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र. एमएमजी. १०८६/३४३७/आरोग्य-९
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक ३० जुलै १९८७.

वाचा :- क्र. एमएजी १०८१/४९०७/आरोग्य-९, दिनांक १९ ऑक्टोबर १९८३-८४ चे आदेश.

निर्णय :-

शासकीय कर्मचा-यांना आणि त्यांच्या कुटुंबियाना शासकीय रुग्णालयामध्ये ... मोफत सेवा मिळण्याचा हक्क आहे. परंतु ब-याच वेळा त्यांना खाजगी रुग्णालयात अतितात्काळ प्रसंगी जावे लागते. खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यावर वैद्यकीय परिपूर्ती मिळण्यामध्ये ब-याच अडचणी उद्भवतात. म्हणून अशा उपचारांकरिता येणा-या खर्चास मान्यता देण्याबद्दलचे आदेश दिनांक १९ ऑगस्ट १९८३ व १९ ऑक्टोबर १९८४ अन्वये काढले आहेत. यामधील तरतूदीप्रमाणे एकंदर १८ अतितात्काळ आजारांच्या संदर्भात खाजगी रुग्णालयात घेतलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीस मान्य आहे. मात्र ही प्रतिपूर्ती व्यक्तिगत प्रमाणामध्ये रु. १० हजार आर्थिक मर्यादेपर्यन्त आहे. अशा आजाराच्या संदर्भात संबंधीत मंडळाच्या उपसंचालकांशी विचार विनिमय करूनच, महाराष्ट्र नागरी सेवा [सेवेच्या सर्वसाधारण शर्ती] नियम १९८१ मधील परिशिष्ट २ अन्वये सुचीबध्द करण्यात आलेल्या विभाग प्रमुखांना त्यांच्या हाताखालील कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची प्रकरणे मंजूर करण्याचे प्राधिकार देण्यात आले आहेत. तसेच विभागीय प्रमुखांच्या संदर्भात, संबंधीत शासकीय विभागांना निर्णय घ्यावे लागतात. परंतू असे आढळून आले आहे की, संबंधीत उपसंचालकांच्या कार्यालयामध्ये त्यांच्या विभागातील सर्व कार्यालयांकडून केसेस पाठविल्या जातात. आणि अशा केसेस निकाली काढण्याकरिता बराच कालावधी लागतो. कारण उपसंचालक हे महिन्यातील २० दिवस तरी कार्यालयीन कामकाजाच्या दौ-यावर असतात.

म्हणून शासन आता याद्वारे असे आदेश देत आहे की दिनांक १ ऑगस्ट, १९८७ पासून उपसंचालक, आरोग्य सेवा कार्यालयाकडे अशा तात्काळ सेवेच्या संदर्भात प्रकरणे न पाठविता संबंधीत जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे पाठविण्यात यावीत. ज्या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये असतील तेथे महाविद्यालयाचे डीन किंवा अधीक्षक यांचेकडे अशा केसेस पाठविण्यात याव्यात. परंतू बृहन्मुंबईतील कार्यालयांनी/विभागांनी खाली नमूद केलेल्या रुग्णालयामध्ये त्या त्या विभागांच्या केसेस पाठवाव्यात. पूर्वीप्रमाणे संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे पाठवू नयेत.

| अ. क्र. | रुग्णालयाचे नाव | विभागाचे नाव |
|---|---|---|
| १. | जे. जे. रुग्णालय, मुंबई | गृह विभाग, सामान्य प्रशासन विभाग, महसूल व वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग. |

| | |
|---|---|
| Date | 15-10 |
| Compilation & G. S. No. | II |

—२.

| | |
|---|---|
| सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई | वित्त विभाग, आरोग्य विभाग, वैधकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नियोजन विभाग, ग्राम विकास विभाग. |
| गोकुळदास तेजपाल हॉस्पिटल मुंबई. | अन्न व नागरी पुरवठा विभाग, उधोग उर्जा व कामगार विभाग, कृषि व सहकार विभाग, पाटबंधारे विभाग, विधान कार्य विभाग. |
| कामा हॉस्पिटल, मुंबई | विधी व न्याय विभाग, नगर विकास विभाग, गृह निर्माण व विशेष सहाय्यक विभाग, पर्यावरण विभाग, शिक्षण व सेवायोजन विभाग. |

३. शासन आता याद्वारे असेही आदेश देत आहे की ज्या कार्यालयांचे विभाग प्रमुख वैधकीय अधिकारी म्हणजे डॉक्टर आहेत, त्या कार्यालयातील कर्मचा-यांची प्रकरणे अशा कार्यालयांनी त्यांच्या स्तरावरच निकाली काढावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/- प्रभाकर भगरे,
कक्ष अधिकारी.

============

क्रमांक लेशा/वै./ख/वशी -५८०
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी. ९-१०-१९८७.

सर्व तहसीलदार,